महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**( सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ )**

# महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) अधिनियम, १९७६

( २० सप्टेंबर, २०११ पर्यंत सुधारित )

**( The Maharashtra Act No. XXXI of 1976 )**

# The Maharashtra Casinos (Control And Tax) Act, 1976

*( As modified upto 20th Sept., 2011 )*

*

**व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याकडून भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र शासन, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.**

२०१३

[किंमत रु. ६.००]

# महाराष्ट्र कॅसिनो ( नियंत्रण आणि कर ) अधिनियम, १९७६

## ( सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ )

### अनुक्रमणिका

**उद्देशिका**


| **कलमे** | | | **पृष्ठ** |
|---|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ. | .. | १ |
| २. | व्याख्या. | .. | १ |
| ३. | कॅसिनोंना लायसन्स देणे आणि लायसन्स दिलेल्या कॅसिनोंना सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ यापासून माफी देणे. | .. | २ |
| ४. | कॅसिनोंच्या लायसन्ससाठी अर्ज करणे आणि असे लायसन्स मंजूर करणे किंवा नाकारणे. | .. | २ |
| ५. | लायसन्स निलंबित किंवा रद्द करण्याची शक्ती. | .. | २ |
| ६. | लायसन्सच्या शर्तींचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती. | .. | २ |
| ७. | कॅसिनोंमधील जुगारावर कर बसविणे. | .. | ३ |
| ८. | लायसन्सधारकाने हिशेब ठेवणे आणि ते शासनाकडे किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडे सादर करणे. | .. | ३ |
| ९. | हिशेब ठेवण्यात आणि ते सादर करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती. | .. | ३ |
| १०. | विवक्षित प्रकरणी उत्तम निर्णयशक्तीनुसार कर निर्धारण करणे. | .. | ३ |
| ११. | कॅसिनो खेळ खेळणाऱ्या व्यक्तींनी लायसन्सच्या शर्तींचे किंवा नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती आणि लायसन्सधारकाने लायसन्सच्या शर्ती प्रदर्शित करणे. | .. | ४ |
| १२. | कंपन्यांनी केलेले अपराध. .. | .. | ४ |
| १३. | अपराधांची तडजोड करणे. .. | .. | ४ |
| १४. | हिशेब सादर करण्यास भाग पाडण्याची किंवा ते तपासण्याची शक्ती. | .. | ५ |
| १५. | प्रवेश करण्याची आणि झडती घेण्याची शक्ती. .. | .. | ५ |
| १६. | अपराध दखलपात्र व जमानत योग्य असणे. .. | .. | ५ |
| १७. | या अधिनियमान्वये केलेल्या कृत्याचे संरक्षण. .. | .. | ५ |
| १८. | नियम करण्याची शक्ती. | .. | ६ |

# सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक २२ जुलै, १९७६ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## महाराष्ट्र राज्यात कॅसिनोंचे नियंत्रण व नियमन करणे आणि कॅसिनोंमधील जुगारावर कर बसविणे या गोष्टींची तरतूद करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यात, कॉसिनोंचे नियंत्रण व नियमन करणे कॅसिनोंमधील जुगारावर कर बसविणे यांबाबत तरतूद करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्ताविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) अधिनियम, १९७६ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेपासून अंमलात येईल.

**२.** संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,— व्याख्या.

(अ) ''कॅसिनो'' म्हणजे, ज्या ठिकाणी कॅसिनो खेळ खेळणे, ते आयोजित करणे किंवा प्रदर्शित करणे यांची तरतूद असेल अशी किंवा जी या गोष्टींसाठी उपयोगात आणली जात असेल किंवा उपयोगात आणण्याचा हेतू असेल अशी सार्वजनिक जागा ;

(ब) ''कॅसिनो खेळ'' म्हणजे, वेळोवेळी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, कोणत्याही उपकरणाच्या किंवा यंत्राच्या सहाय्याने खेळला जाणारा नशिबाचा खेळ धरून, ज्यावर पैज लावता येईल किंवा जुगार खेळता येतील, असे सर्व किंवा कोणताही खेळ ;

(क) ''जागा'' या संज्ञेत, इमारत किंवा खोली किंवा इमारतीचा अन्य कोणताही भाग, किंवा तंबू, आवार, मोकळी जागा, वाहन किंवा जहाज यांचा समावेश होईल ;

(ड) ''सार्वजनिक जागा'' या संज्ञेत, पैसे भरुन किंवा अन्यथा, जनतेला जेथे प्रवेश करता येईल किंवा प्रवेश करण्याची परवानगी असेल अशा जागेचा अंतर्भाव होतो ;

(इ) ''विहित'' म्हणजे, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित.

**३.** (१) या अधिनियमाच्या उपबंधांनुसार ज्याच्या बाबतीत लायसन्स दिले गेले आहे आणि असे लायसन्स अंमलात आहे अशा कॅसिनोव्यतिरिक्त, कोणत्याही सार्वजनिक जागी, कोणतीही व्यक्ती कोणतेही कॅसिनो खेळ खेळणार नाही, ते आयोजित करणार नाही किंवा प्रदर्शित करणार नाही. कॅसिनोंना लायसन्स देणे आणि लायसन्स दिलेल्या कॅसिनोंना

सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ यापासून माफी देणे.

(२) या अधिनियमान्वये लायसन्स दिलेल्या कोणत्याही कॅसिनोला किंवा अशा कॅसिनोत खेळण्यात, आयोजित करण्यात किंवा प्रदर्शित करण्यात येतील अशा कोणत्याही कॅसिनो खेळांना, मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ यातील कोणताही मजकूर लागू होणार नाही.

कॅसिनोच्या लायसन्ससाठी अर्ज करणे आणि असे लायसन्स मंजूर करणे किंवा नाकारणे.

**४.** (१) कलम ३, पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेले लायसन्स घेण्याचा हेतू असलेली प्रत्येक व्यक्ती, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने, राज्य शासनाकडे लेखी अर्ज करील.

(२) असा अर्ज मिळाल्यानंतर, राज्य शासनास, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर लेखी आदेशाद्वारे, असे लायसन्स मंजूर करता येईल किंवा कोणतीही कारणे दिल्याशिवाय ते मंजूर करण्यास नकार देता येईल :

परंतु, जेव्हा असे लायसन्स मंजूर करण्यास राज्य शासन नकार देईल तेव्हा, ते आपल्या अभिलेखात अशा नकाराबद्दलच्या कारणांचे संक्षिप्त टाचण करून ठेवील.

(३) ज्या फीचा भरणा केल्यानंतर, ज्या कालावधीसाठी आणि ज्या शर्तीस अधीन ठेवून लायसन्स मंजूर करता येईल ती फी, तो कालावधी आणि त्या शर्ती विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील ;

(४) राज्य शासनास, त्याजकडे अर्ज करण्यात आला असता, लायसन्सच्या नवीकरणासाठी विहित केलेली फी दिल्यानंतर, या अधिनियमान्वये मंजूर करण्यात आलेल्या लायसन्सचे नवीकरण करता येईल किंवा कोणतीही कारणे दिल्याशिवाय, अशा कोणत्याही लायसन्सच्या नवीकरणास नकार देता येईल :

परंतु अशा नकाराची कारणे त्याच्या अभिलेखात नमूद करण्यात येतील.

लायसन्स निलंबित किंवा रद्द करण्याची शक्ती

**५.** (१) या अधिनियमाखालील कोणत्याही लायसन्सधारकास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्यानंतर, राज्य शासनास, कोणत्याही वेळी, पुढील कोणत्याही एका किंवा अधिक कारणांवरुन लायसन्स निलंबित किंवा रद्द करता येईल :—

(अ) ज्यात अधीन ठेवून लायसन्स मंजूर करण्यात आले होते अशा कोणत्याही शर्तीचा भंग झालेला आहे ;

(ब) या अधिनियमाच्या किंवा त्या अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाच्या कोणत्याही उपबंधांचे लायसन्सधारकाने उल्लंघन केले आहे ;

(२) जेव्हा असे लायसन्स निलंबित किंवा रद्द करण्यात येईल तेव्हा, राज्य शासन, असे लायसन्स निलंबित किंवा रद्द केल्याबद्दलच्या कारणाची संक्षिप्त नोंद करील आणि ज्याचे लायसन्स निलंबित किंवा रद्द करण्यात आले असेल त्या व्यक्तीस, त्याची एक प्रत देईल.

लायसन्सच्या शर्तीचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

**६.** लगतपूर्ववर्ती कलमाच्या उपबंधांस बाध देऊ न देता, या अधिनियमाखालील कोणताही लायसन्सधारक किंवा त्याच्या वतीने कामे करणारी कोणतीही व्यक्ती याने/हिने, लायसन्सच्या कोणत्याही शर्तीचा भंग केला तर त्यास/तिला, दोषसिद्धीनंतर, पाच हजार रूपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

कॅसिनों मधील जुगारावर कर बसविणे.

**७.** (१) या अधिनियमाखाली लायसन्स दिलेल्या कोणत्याही कॅसिनोत खेळल्या जाणाऱ्या कॅसिनो खेळात भाग घेणाऱ्यांनी बाजी किंवा पैज लावून दिलेल्या किंवा देण्याचे कबूल केलेल्या सर्व पैशावर राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे, अशा सर्व पैशाच्या २५ टक्यांपेक्षा अधिक नसेल अशा दराने एक कर बसविण्यात येईल व तो वसूल करून राज्य शासनास देण्यात येईल. अशा रीतीने बसविलेल्या कराच्या रकमेबरोबरचा अशा पैशातील असा भाग हा (खेळात) भाग घेणाऱ्यांकडून करापोटी देण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि तो, प्रत्येक खेळाच्या वेळी, लायसन्सधारकांकडून राज्य शासनाच्या वतीने वसूल करण्यात येईल आणि तो विहित करण्यात येईल अशा रीतीने राज्य शासनास किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास देण्यात येईल.

(२) या अधिनियमान्वये देय असलेला कर, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे लायसन्स धारकांकडून वसूल करण्यात येईल.

लायसन्स धारकाने हिशेब ठेवणे आणि ते शासनाकडे किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडे सादर करणे.

**८.** या अधिनियमाखालील प्रत्येक लायसन्सधारक, विहित करण्यात येईल अशा रीतीने, कॅसिनो संबंधीचे हिशेब ठेवील आणि राज्य शासनाकडे किंवा याबाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे, विहित नमुन्यात आणि विहित कालांतराने त्या हिशेबाचे विवरणपत्र सादर करील. अशा हिशेबात विशेषेकरून कॅसिनोत खेळल्या जाणाऱ्या प्रत्येक कॅसिनो खेळात बाजी किंवा पैज लावून देण्यात आलेला पैसा आणि विहित करण्यात येईल असा इतर तपशील दर्शविण्यात येईल.

हिशेब ठेवण्यात आणि ते सादर करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

**९.** निकटपूर्ववर्ती कलमाखाली हिशेब ठेवण्यास किंवा हिशेबांची विवरणपत्रे सादर करण्यास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती, त्या कलमान्वये आवश्यक असल्याप्रमाणे हिशेब ठेवण्यात किंवा हिशेबांची विवरणपत्रे सादर करण्यात कसूर करील किंवा जे खोटे असतील आणि जे खोटे असल्याचे त्यास माहीत असेल किंवा जे खोटे असल्याचे त्यास वाटत असेल किंवा जे खरे असल्याचे त्यास वाटत नसेल असे हिशेब ठेवील किंवा विवरणपत्रे सादर करील तर, कलम ५ च्या उपबंधास बाध न आणता, त्यास दोषसिद्धीनंतर, पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

विवक्षित प्रकरणी उत्तम निर्णय शक्तीनुसार कर निर्धारण करणे.

**१०.** (१) ज्याबाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची कोणत्याही लायसन्सधारकाने ठेवलेल्या हिशेबाच्या अचूकतेबद्दल किंवा पूर्णतेबद्दल खात्री होणार नाही किंवा या अधिनियमान्वये आवश्यक असल्याप्रमाणे हिशेबाचे कोणतेही विवरणपत्र सादर करण्यात लायसन्सधारकाने कसूर केली असेल त्याबाबतीत उक्त अधिकारी, लायसन्सधारकास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि त्याने जमा केली असेल अशी सर्व संबंद्ध माहिती विचारात घेतल्यानंतर आपल्या उत्तम निर्णयशक्तीनुसार, लायसन्सधारकाकडून देय असलेल्या कराचे निर्धारण करील आणि लेखी आदेशाद्वारे त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस किंवा त्यापूर्वी, अशा रीतीने निर्धारित केलेल्या कराची रक्कम देण्यास लायसन्सधारकास फर्मावील.

(२) पोट-कलम (१) खाली केलेल्या कोणत्याही आदेशाद्वारे व्यथित झालेल्या कोणत्याही लायसन्सधारकास, असा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या मुदतीच्या आत, त्या आदेशाविरुद्ध, राज्य शासनाकडे, अपील करता येईल आणि राज्य शासनाने अपिलात दिलेला आदेश अंतिम असेल आणि कोणत्याही न्यायालयात त्याविरूद्ध कोणताही आक्षेप घेतला जाणार नाही.

कॅसिनो खेळ खेळणाऱ्या व्यक्तींनी लायसन्सच्या शर्तींचे किंवा नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती आणि लायसन्स धारकाने लायसन्सच्या शर्ती प्रदर्शित करणे.

**११.** (१) या अधिनियमाखाली लायसन्स दिलेल्या कॅसिनोत कोणताही कॅसिनो खेळ खेळताना, लायसन्सधारक खेरीज करून कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (२) खाली प्रदर्शित करण्यात आलेल्या लायसन्सच्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचा किंवा असे खेळ खेळतांना पालन करावयाच्या नियमांचा भंग करील तर, तिला, दोषसिद्धीनंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(२) प्रत्येक लायसन्सधारक कॅसिनोमधील प्रमुख ठिकाणी, ज्या शर्तीस अधीन राहून त्याला लायसन्स मंजूर करण्यात आले असेल त्या शर्ती प्रदर्शित करील.

कंपन्यांनी केलेले अपराध

**१२.** (१) या अधिनियमाखाली एखादा अपराध कंपनीने केलेला असेल त्याबाबतीत, अपराध घडला त्यावेळी कंपनीची प्रभारी असणारी आणि कंपनीचे कामकाज चालविण्यासाठी कंपनीस जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती तसेच कंपनीदेखील, त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास आणि तद्नुसार शिक्षेस ती पात्र ठरेल :

परंतु, अपराध हा आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण सर्व वाजवी दक्षता घेतली होती असे ती व्यक्ती सिद्ध करील तर, या पोट-कलमातील कोणत्याही मजकुरामुळे अशी व्यक्ती या अधिनियमात तरतूद केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केलेला असेल व तो अपराध कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी याच्या संमतीने किंवा त्याने कानाडोळा केल्यामुळे, घडलेला आहे किंवा त्याच्याकडून झालेल्या कोणत्याही हयगयीशी त्याचा संबंध आहे असे सिद्ध झाले असेल त्याबाबतीत, असा संचालक व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार त्याच्याविरूद्ध कारवाई केली जाण्यास व शिक्षा केली जाण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनांसाठी,—

(अ) ''कंपनी'' म्हणजे, कोणतेही निगम निकाय, व त्यात भागीदारी संस्थेचा किंवा व्यक्तींच्या इतर संघाचा समावेश होतो ; आणि

(ब) भागीदारी संस्थेच्या संबंधात ''संचालक'' म्हणजे, त्या भागीदारी संस्थेतील भागीदार.

अपराधांची तडजोड करणे.

**१३.** (१) राज्य शासनास किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल खटला दाखल करण्यापूर्वी किंवा त्यानंतर, अशा अपराधाचा आरोप करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून, अपराधाच्या तडजोडी दाखल, अशा अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आल्यावर तो दंडाच्या ज्या कमाल रकमेस पात्र ठरेल त्या रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक नसेल अशी, राज्य शासन किंवा यथास्थिति, प्राधिकृत अधिकारी यांजकडून ठरविण्यात येईल त्याप्रमाणे, रक्कम स्वीकारता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये ठरविण्यात येईल अशी रक्कम देण्यात आल्यावर आरोपित व्यक्तीविरूद्ध त्याच अपराधासंबंधात कोणतीही आणखी कार्यवाही करण्यात येणार नाही.

**१४.** राज्य शासनास किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, वाजवी वेळामध्ये,— हिशेब सादर करण्यास भाग पाडण्याची किंवा ते तपासण्याची शक्ती

(एक) हिशेब किंवा इतर कागदपत्र त्याजपुढे सादर करण्यास किंवा इतर कोणतीही माहिती देण्यास कोणत्याही लायसन्सधारकास फर्माविता येईल, किंवा

(दोन) कोणत्याही लायसन्सधारकाच्या हिशेबाची तपासणी करता येईल.

**१५.** (१) राज्य शासन या बाबतीत सामान्य किंवा विशेष लेखी आदेशाद्वारे प्राधिकृत करील अशा, सहायक पोलीस आयुक्त किंवा पोलीस उप-अधीक्षक, यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने,— प्रवेश करण्याची आणि झडती घेण्याची शक्ती.

(अ) हा अधिनियम किंवा त्या अन्वये केलेले नियम याच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करण्यात आले आहे किंवा करण्यात येत आहे किंवा करण्याचा संभव आहे किंवा लायसन्सच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग करण्यात आला आहे किंवा भंग करण्यात येत आहे किंवा भंग केला जाण्याचा संभव आहे असे त्यास सकारण वाटेल त्याबाबतीत, कोणत्याही कॅसिनोमध्ये, त्यास आवश्यक वाटेल असे सहायक घेऊन, दिवसा किंवा रात्री, आवश्यकता भासेल तर बळाचा वापर करून, प्रवेश करणे ;

(ब) त्या जागेची आणि तेथे त्यास आढळून येतील अशा व्यक्तींची झडती घेणे ;

(क) खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही उल्लंघनाशी किंवा भंगाशी संबंधित असतील अशा किंवा ज्यांच्याविरूध्द वाजवी तक्रार करण्यात आली असेल अशा किंवा ज्यांच्याबद्दल विश्वसनीय माहिती मिळाली असेल अशा किंवा ज्या संबंधित असल्याबद्दल वाजवी संशय येत असेल अशा सर्व व्यक्तींना, अभिरक्षेत घेऊन, दंडाधिकाऱ्यापुढे सादर करणे, आणि

(ड) असे उल्लंघन किंवा भंग यासंबंधात वापरण्याचा उद्देश असेल किंवा वापरण्यात आल्याचा वाजवी संशय असेल अशा, त्यात सापडलेल्या सर्व वस्तू जप्त करणे ;

हे विधि संमत असेल.

(२) या कलमाखालील सर्व झडत्या, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या उपबंधानुसार घेण्यात येतील.

**१६.** या अधिनियमाखालील सर्व अपराध हे दखलपात्र व जमानतयोग्य असतील. अपराध दखलपात्र व जमानतयोग्य असणे.

**१७.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये जे कोणतेही कृत्य सद्भावनेने करण्यात आले असेल किंवा करण्याचा हेतू असेल अशा कोणत्याही कृत्याबद्दल, राज्य शासन किंवा शासनाचा कोणताही अधिकारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही. या अधिनियमान्वये केलेल्या कृत्याचे संरक्षण.

नियम करण्याची शक्ती **१८.** (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, नियम करता येतील ;

(२) विशेषेकरून आणि पूर्ववर्ती शक्तींच्या सामान्यतेस बाध न आणता, अशा नियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींची तरतूद करता येईल ;

(अ) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी जे कॅसिनो खेळ असतील असे पैजा लावण्याचे किंवा जुगाराचे खेळ आणि असे खेळ खेळताना पालन करावयाचे नियम ;

(ब) लायसन्ससाठी अर्ज करण्याचा नमुना व अर्ज करण्याची रीत आणि ती मंजूर होण्यासाठी किंवा तिच्या नवीकरणासाठी द्यावयाची फी आणि ज्या शर्तीस अधीन ठेवून ती मंजूर करण्यात येईल त्या शर्ती ;

(क) कॅसिनोसंबंधीचे हिशेब ठेवण्याची रीत, हिशेबात दर्शवावयाचे इतर तपशील आणि ज्या नमुन्यात आणि ज्या कालांतराने ते राज्य शासनाकडे किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येतील तो नमुना व ते कालांतर ;

(ड) कॅसिनोमध्ये ज्यांना प्रवेश देता येईल किंवा कामावर ठेवता येईल किंवा कॅसिनो खेळ खेळण्यास किंवा असे खेळ आयोजित करण्यात किंवा त्यांच्या प्रदर्शनात अन्यथा भाग घेण्यास ज्यांना परवानगी देता येईल अशा व्यक्तींच्या वयासंबंधातील निर्बंध किंवा शर्ती ;

(इ) कॅसिनोमध्ये भाग घेणारांना व पाहुण्यांना प्रवेश देण्यासंबंधातील इतर निर्बंध किंवा शर्ती आणि त्यांच्या प्रवेशासाठी आकारावयाची कोणतीही असल्यास, फी ;

(फ) कॅसिनो उघडा ठेवता येईल त्या वेळा व ते दिवस ;

(ग) कॅसिनो म्हणून ज्यांचा वापर करता येईल अशा जागांचे प्रकार व त्यांचा तपशील आणि ज्यांमध्ये कॅसिनो वसवता येतील त्या वसत्या आणि कोणत्याही क्षेत्रात किंवा वसतिस्थानात मंजूर करता येईल अशा लायसन्सांची कमाल संख्या ;

(ह) कॅसिनोमध्ये व त्याबाहेर प्रदर्शित करावयाच्या नोटिशींचे प्रकार आणि ते ज्या रीतीने प्रदर्शित करावयाचे ती रीत ;

(आय) कॅसिनो संबंधातील जाहिरातींवरील निर्बंध किंवा शर्ती ;

(जे) कॅसिनो खेळात भाग घेणारासाठी लायसन्सधारकाने तरतूद करावयाच्या उधारीसंबंधीच्या सवलतीबाबतचे निर्बंध किंवा शर्ती आणि कॅसिनो खेळात, बदली व्यक्तीद्वारे भाग घेण्यास प्रतिषेध करणे किंवा त्याचे नियमन करणे ;

(के) जी विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) कोणताही नियम करताना, राज्य शासनास असा निदेश देता येईल की, लायसन्सधारकाने किंवा त्याच्या विद्यमाने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अशा नियमाचा भंग केल्यास, ती, दोषसिद्धीनंतर पाच हजार रुपयांपेक्षा अधिक नसणाऱ्या दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल आणि इतर कोणत्याही व्यक्तीने (नियमाचा) भंग केल्यास, ती दोषसिद्धीनंतर, एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेच्या दंडास पात्र ठरेल.

(४) ह्या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येईल किंवा यथास्थिति येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

एच ७६२-६०५२-१०-२०१३

**शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.**

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  (प्रकाशन शाखा) नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ व ३६३०६९५

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक,
  पुणे-४११ ००१
  दूरध्वनी : (०२०) २६१२५८०८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
  दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, पैठण रोड,
  औरंगाबाद-४३१ ००१
  दूरध्वनी : (०२४०) २३३१५२५

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३
  दूरध्वनी : (०२३१) २६५०४०२

आणि

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते